.nagpur

# NMC e NEWS LETTER

मे २०१९



2

वडाच्या झाडाला वाचविण्यासाठी मनपा आयुक्तांची अशीही धडपड

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात...



### दहशतवाद विरोधी दिनानिमित्त कर्मचा-यांनी घेतली शपथ

नागपूर : माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी (ता.२१) नागपूर महानगरपालिकेमध्ये अभिवादन करण्यात आले. महापौर नंदा जिचकार, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, आयुक्त अभिजीत बांगर यांनी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची पुण्यतिथी देशभर दहशतवाद विरोधी दिन म्हणून साजरी करण्यात येते. याप्रसंगी महापौर नंदा जिचकार यांनी उपस्थित सर्व कर्मचारी व अधिका-यांना दहशतवाद विरोधी दिनाची शपथ दिली. यावेळी नगरसेविका नेहा निकोसे, नगरसेवक दिनेश यादव, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त राजेश मोहिते, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता श्वेता बॅनर्जी, कार्यकारी अभियंता मनोज गणवीर, सहायक आयुक्त मिलींद मेश्राम, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. सुनील कांबळे, शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस, सहायक दिलीप तांदळे, राजेश निकोसे यांच्यासह मनपाच्या विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले.

### महाराष्ट्रदिनी मनपात महापौरांच्या हस्ते ध्वजारोहण



नागपूर : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ५९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून बुधवारी (ता. १) नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील हिरवळीवर महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, मनपा आयुक्त अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त राजेश मोहिते, उपायुक्त नितीन कापडणीस, सहायक आयुक्त महेश धामेचा, राजू भिवगडे, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, आरोग्य अधिकारी (दवाखाने) डॉ. सरीता कामदार, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) सुनील कांबळे, कार्यकारी अभियंता श्वेता बॅनर्जी, राजू राहाटे, गिरीश वासनिक, अविनाश बाराहाते, शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर, प्रमुख अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, निगम अधीक्षक मदन सुभेदार आदी उपस्थित होते.



### उन्हाळी शिबिरात विद्यार्थी घेत आहेत कराटेचे प्रशिक्षण

नागपूर : उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये मनपा आणि आई फाऊंडेशनने शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रभाग क्र. ३०, जुना सक्करदरा येथील विश्वशांती बुद्ध विहारात नि:शुल्क कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. एक महिना चालणाऱ्या या प्रशिक्षण शिबिराला परिसरातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सुमारे ६० विद्यार्थ्यांचा शिबिरात सहभाग आहे. मनपाचे क्रीडा सभापती नागेश सहारे यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या या शिबिरात प्रशिक्षक राजेश लारोकर आणि मोनाली सोनवणे विद्यार्थ्यांना कराटेचे धडे देत आहेत.

## संयुक्त प्रयत्नातून करू नागपूरचा शाश्वत विकास : महापौर नंदा जिचकार



नागपूर : ऑक्टोबर २०१८ मध्ये झालेल्या स्टार्ट अप फेस्टच्या माध्यमातून नवीन उद्योगांना बूस्ट देण्याचा प्रयत्न केला. हॅकॉथॉनच्या माध्यमातून शहर विकासासाठी नवीन संकल्पनांना आमंत्रित केले. आता या संकल्पनांवर अंमल करण्याची वेळ आहे. स्वयंसेवी संस्थांकडे तज्ज्ञ असतात. कौशल्य असते. अनुभव असतो. त्यामुळे स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने संयुक्त प्रयत्नातून नागपूरचा शाश्वत विकास घडवून आणू, असे आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी केले.'शहर विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग' ह्या संकल्पनेतून महापौर नंदा जिचकार यांनी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना आमंत्रित केले होते. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति स्थायी समिती सभागृहात आयोजित बैठकीला महापौर नंदा जिचकार यांच्यासह अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त राजेश मोहिते, स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीचे सभापती संजय बंगाले, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, मेयर इनोव्हेशन कौन्सिलचे कन्वेनर प्रशांत कडू, महापौर इनोव्हेशन अवॉर्डचे मुख्य समन्वयक केतन मोहितकर, यांच्यासह शहरातील विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पुढे बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, फेब्रुवारी महिन्यात आयोजित केलेल्या हॅकॉथॉनमध्ये तीन हजारांपेक्षा अधिक नावीन्यपूर्ण संकल्पना आल्या होत्या. परंतु त्यातील निवडक संकल्पनांना महापौर इनोव्हेशन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. त्या संकल्पना आता प्रत्यक्षात आणण्यासाठी शहरातील स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य आवश्यक आहे. स्वयंसेवी संस्थांचा अनुभव, त्यांच्याकडे असलेले कौशल्य आणि तज्ज्ञ मंडळीच्या सहकार्याने शहरात शाश्वत विकास घडवायचा आहे. त्यासाठी आता सर्वांनी सोबत येऊन हा शिवधनुष्य उचलावा, असे आवाहन त्यांनी केले. आता दरवर्षी महापौर इनोव्हेशन अवॉर्ड आयोजित करण्यात येणार असून यापुढे त्यामाध्यमातून येणाऱ्या संकल्पनांचा उपयोग शहर विकासासाठी केला जाईल, असेही महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी सांगितले. टाटा ट्रस्टच्या सहकार्याने नागपूर महानगरपालिकाअंतर्गत असलेल्या नागरी आरोग्य केंद्राचा कायापालट करण्यात आला. त्यामुळे या आरोग्य केंद्राकडे नागरिकांचा कल वाढला आहे. या बदललेल्या नागरी आरोग्य केंद्रासंदर्भात सादरीकरण करण्यात आले.



## सुमधूर गाण्यातून 'आई'ला सलाम...!

नागपूर : जागतिक मातृदिनानिमित्त नागपूर महानगरपालिका, आई फाऊंडेशन आणि हार्ट बीट्स यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी हिंदी सुमधूर गाण्यांचा कार्यक्रम रविवारी (ता.१२) डॉ.वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नंदा जिचकार, शिक्षण समिती सभापती प्रा.दिलीप दिवे, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, संयोजक प्रशांत सहारे, विजय जेथे प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरूवात प्रशांत सहारे आणि संजीवनी बुटी यांच्या 'विठू माऊली' या गाण्याने झाली. त्यानंतर 'माय भवानी तुझे लेकरू...' हे गीत संजीवनी यांनी गायले. 'तु कितनी अच्छी है', 'ए माँ तेरी सुरत से अलग...', 'बडा नटखट है', 'भय इथले संपत नाही', 'या चिमण्यांनो परत फिरा रे', 'आ री आ निंदिया', 'ती गेली तेव्हा पाऊस रिमझीम होता' यासारख्या सुमधूर गाण्यांनी ररिकांना मंत्रमुग्ध केले. प्रशांत सहारे आणि संजीवनी बुटी यांच्या समवेत प्रशांत वाळीलकर, नितीन झाडे, प्रतीक जैन, प्राची सहारे, अनुष्का काळे, सुनिता कांबळे, सानवी अनिल तेलंग यांच्या बहारदार गाण्यांनी रसिकांना मोहिनी घातली. संगीत नियोजन प्रशांत नागमोते यांचे होते. निवेदन नम्रता अग्निहोत्री यांनी केले. कार्यक्रमाचे विशेष म्हणजे कार्यक्रमामध्ये महापौर नंदा जिचकार आणि रामभाऊ इंगोले यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला साथसंगत करणाऱ्या कलावंताचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## शहराबाहेरील पाच कि.मी. नदीचीही होणार स्वच्छता



नागपूर : नागपुरातील मुख्य तीन नद्यांसह अंतर्गत नाले आणि पावसाळी नाल्यांच्या स्वच्छता अभियानाने वेग धरला आहे. शहरातील नदी–नाल्यांच्या स्वच्छतेसह शहर सीमेबाहेरील सुमारे पाच कि.मी. लांबीच्या नदींचीही स्वच्छता करा. त्यासाठी अतिरिक्त पोकलेन व मनुष्यबळ उपलब्ध करून द्या, असे निर्देश मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. नागपूर शहरातील नाग नदी, पिवळी नदी आणि पोरा नदी स्वच्छता अभियाला ५ मे पासून सुरुवात झाली. अभियानांतर्गत झालेल्या नदी स्वच्छतेची प्रगती जाणून घेण्यासाठी मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी शुक्रवारी (ता. १०) आढावा बैठकीत घेतली. सदर बैठकीत त्यांनी शहराबाहेरील नदी स्वच्छतेचे निर्देश दिलेत. बैठकीला अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, डॉ. प्रदीप दासरवार, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) सुनील कांबळे, कार्यकारी अभियंता मोती कुकरेजा, सतीश नेरळ, अमीन अख्तर, राजेंद्र राहाटे, सहायक आयुक्त प्रकाश वऱ्हाडे, ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर मेट्रो तसेच नदी स्वच्छता अभियानाशी संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी आयुक्त अभिजीत बांगर यांनी शहरात सुरू असलेल्या नदी स्वच्छता अभियानाचा आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या नाग नदी, पिवळी नदी, पोरा नदीअंतर्गत दहाही स्ट्रेचमध्ये स्वच्छतेचे कार्य सुरू झाले आहे. दहाही स्ट्रेचमध्ये पोकलेन लागले असून आवश्यकता भासल्यास मनुष्यबळाच्या माध्यमातूनही सफाई सुरू आहे. पिवळी नदीचा बराचसा भाग स्वच्छ करण्याची जबाबदारी नागपूर सुधार प्रन्यासने उचलली असून त्या कामालाही सुरुवात झाली आहे. अंतर्गत नाल्यांची आणि पावसाळी नाल्यांची स्वच्छताही सुरु झाली आहे. मनुष्यबळ आणि मशीनच्या माध्यमातून ही सफाई सुरू आहे. मागील वर्षी वर्धा मार्गावर साचलेल्या पाण्यामुळे मोठे नुकसान झाले होते. यावर्षी तशी पुनरावृत्ती टाळण्यासाठी मेट्रो मार्गाच्या लगतच्या नाल्या मेट्रोने युद्धपातळीवर स्वच्छ कराव्यात, असे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले.

## भूमिगत केबलची कामे जूनपुर्वी पूर्ण करा



नागपूर : पावसाळ्यामध्ये नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होउ नये यासाठी भूमिगत करण्यात येणारी ऑप्टिकल फायबर केबल, इलेक्ट्रीक केबलची कामे येत्या जूनपर्यंत पूर्ण करणे व या कालावधीमध्ये कोणतेही खोदकाम करू नये, असे निर्देश नागपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी दिले. शहरात विविध ठिकाणी ऑप्टिकल फायबर केबल, इलेक्ट्रीक केबल भूमिगत टाकण्यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे यांच्या अध्यक्षतेत आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीत अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता (विद्युत) अमीन अख्तर, कार्यकारी अभियंता (स्लम) राजेंद्र रहाटे, कार्यकारी अभियंता गिरीश वासनिक, कार्यकारी अभियंता (वाहतूक) ए.जे. बोदेले, ए.जी. नागदीवे, राजेश भूतकर, अनिरूद्ध चौगंजकर, एम.आर. कुकरेजा, अविनाश बारहाते, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, उपअभियंता डी.एस. बिसेन आदी उपस्थित होते. शहरात मनपाच्या परवानगीने विविध ठिकाणी विद्युत, बीएसएनएल, जिओ आदी केबलसह सिवर लाईन, पाण्याच्या लाईन भूमिगत टाकण्यात आल्या आहेत. यासाठी ठिकठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. हे खोदकाम येत्या जूनपुर्वी तातडीने पूर्ण करणे. नवीन व जुन्या सर्व परवानगीधारक विभाग, एजन्सीना ही अट लागू असून जूनच्या कालावधीमध्ये अत्यंत तातडीचे काम असल्यास त्यास विशेष परवानगी देण्यात येईल. अन्यथा मनपातर्फे दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचेही अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी यावेळी सांगतिले. स्मार्ट सिटीच्या दृष्टीने शहरात कुठेच खोदकाम केलेली माती पडून राहू नये याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. केबल किंवा लाइन टाकल्यानंतर खड्ड्यांमध्ये सीएलएसएम मटेरिअल भरण्याचेही त्यांनी निर्देश दिले. याशिवाय आतापर्यंत करण्यात आलेल्या भूमिगत केबलच्या कामाची पाहणी करून व्यवस्थित स्थितीत न आढळल्यास दुरूस्ती करून घेण्याचेही निर्देश देण्यात आले.

## नदी, नाले स्वच्छतेच्या कामाला गती ७५ टक्के काम पूर्ण

### आठवडाभरात होणार संपूर्ण स्वच्छता





नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या वतीने पाच मे पासून नदी व नाले स्वच्छता अभियान सुरू करण्यात आला. या अभियानामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुट्या राहु नयेत यासाठी महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, आयुक्त अभिजीत बांगर यांच्यासह विविध पदाधिका–यांनी व अधिका–यांनी वेळोवेळी अभियानाची पाहणी केली. त्याची फलश्रुती म्हणून नागपूर शहरातील नदी व नाले सफाई अभियानाला गती मिळाली असून या अभियानाद्वारे नदी व नाले सफाईचे सुमारे ७५ काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम येत्या आठवडाभरात पूर्ण करून १० जूनपर्यंत संपूर्ण नदी व नाले स्वच्छतेचे लक्ष गाठले जाणार आहे. शहरातील नदी व नाले स्वच्छता अभियानासंदर्भात सोमवारी (ता.३) आयुक्त अभिजीत बांगर यांच्या अध्यक्षतेत आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीत अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, नदी स्वच्छता अभियानाचे नोडल अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. सुनील कांबळे, कार्यकारी अभियंता सर्वश्री गिरीश वासनिक, एम.जी.कुकरेजा, आसाराम बोदेले, राजेश भुतकर, अमीन अख्तर, राजेंद्र रहाटे, अविनाश बारहाते, सहायक आयुक्त प्रकाश वराडे, उपअभियंता श्री. गभने आदी उपस्थित होते. या कामाची महापौरांसह विविध पदाधिका–यांकडून वेळोवेळी पाहणीही करून आवश्यक ते निर्देशही देण्यात येत आहे. १० जूनपर्यंत संपूर्ण नदी व नाले स्वच्छता अभियान पूर्ण व्हावेत यासाठी प्रशासनाकडून प्राधान्याने काम सुरू आहे. ज्या ठिकाणी पोकलेन, टिप्परची कमतरता असल्याचे निदर्शनास येते त्या ठिकाणी त्याची प्रशासनाकडून पूर्तता केली जात आहे.



## जागतिक योग दिवसाचे नागपुरात २१ जूनला आयोजन

नागपूर : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही २१ जून रोजी जागतिक योग दिवसाच्या निमित्ताने नागपुरातील यशवंत स्टेडियम येथे नागपूर महानगरपालिकेच्या नेतृत्वात विविध योगाभ्यासी मंडळ आणि संस्थांच्या सहकार्याने भव्य आयोजन करण्यात येत आहे. या आयोजनात योग क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध संस्थांसह नागरिकांनी मोठ्या संख्येत सहभागी होण्याचे आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी केले. योग दिवस' आयोजनसंदर्भात महापौर नंदा जिचकार यांच्या अध्यक्षतेत नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात सोमवारी (ता. ३) प्राथमिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीला उपमहापौर दीपराज पार्डीकर, जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके, उपायुक्त नितीन कापडणीस, सहायक आयुक्त महेश मोरोणे, अशोक पाटील, शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर, क्रीडा अधिकारी नरेश सवाईथूल, कार्यकारी अभियंता मनोज गणवीर, सहायक अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. विजय जोशी, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. सुनील कांबळे, प्रमुख अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, उपअभियंता कल्पना मेश्राम, क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी, जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाचे सुनील सिर्सीकर, प्रशांत राजूरकर, राहुल कार्लटकर, नागपूर जिल्हा योग असोशिएशनचे अमित मोहगावकर, डॉ. गंगाधर कडू यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे यांनी योग दिवस आयोजन तयारीबाबतची माहिती दिली. शहरातील नागरिकांना विविध भागातून येण्यासाठी बसेसची व्यवस्था, कार्यक्रमस्थळी योग साधकांसाठी करण्यात येणारी पाण्याची व्यवस्था, कार्यक्रमासंबंधीची रूपरेषा आदी माहिती महापौर नंदा जिचकार यांनी जाणून घेतली. कार्यक्रमस्थळी पावसाची शक्यता लक्षात घेता आवश्यक त्या सोयी करण्यात याव्यात. स्वच्छतेची खबरदारी घ्यावी. कार्यक्रमाच्या ठिकाणी कुणीही कागदी पत्रके वाटणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेत.

# अध्ययन अध्यापन प्रणाली बदलून विद्यार्थ्यांचा दर्जा उंचावा : विभागीय आयुक्त डॉ. संजीवकुमार



नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या शाळांसह सहा जिल्ह्यांतील शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे 'असर'तर्फे सर्व्हे करण्यात आले. यामध्ये मनपा शाळांतील विद्यार्थी भाषा, गणित विषयामध्ये कमकुवत असल्याचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे येत्या शैक्षणिक सत्रात प्रत्येक मुख्याध्यापक शिक्षकांनी अध्ययन, अध्यापन प्रणाली बदलून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने कार्य करा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. संजीवकुमार यांनी केले.नागपूर महानगरपालिकेच्या समग्र शिक्षा विभागाच्या वतीने शनिवारी (ता. ४) रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात अध्ययन निष्पत्ती व मुलभूत क्षमता विकास कार्यक्रमांतर्गत मनपा शाळांमधील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांची अध्ययन स्तर निश्चीती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विभागीय आयुक्त डॉ. संजीवकुमार बोलत होते. मंचावर मनपाचे अतिरिक्त आयुक्त राम जोशी, तहसीलदार श्री. वाघमारे, मनपा शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर, डीआयसीपीटीचे प्राचार्य रवींद्र रमतकर उपस्थित होते. पुढे बोलताना विभागीय आयुक्त डॉ. संजीवकुमार म्हणाले, 'असर'द्वारे मनपाच्या शाळांसह नागपूर, भंडारा, चंद्रपूर, वर्धा जिल्ह्यांमधील शाळांच्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे सर्व्हे करण्यात आले. या अंतर्गत 'असर'चे टूल वापरून विविध स्तरावर विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात आली. यामध्ये पारशिवणी तालुक्यातील शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या ४९ टक्के मुलांनाच वाचता येत असल्याचे लक्षात आले. यानंतर येथील शिक्षक व मुख्याध्यापकांनी वेळोवेळी चर्चा करून, अध्ययन व अध्यापन प्रणालीमध्ये विविध प्रयोग करून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी कार्य केले. त्याचे फळ म्हणून अवघ्या तीन महिन्यातच येथील ७३ टक्के मुलांना वाचता येत असल्याचे पुढील सर्व्हेमध्ये दिसून आले. मनपा शाळांमध्ये हे प्रमाण ४३ टक्केच असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे येत्या शैक्षणिक सत्रामध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांनी विशेष प्रयत्न करून किमान ८६ टक्क्यांवर हे प्रमाण नेण्याचे आवाहनही यावेळी विभागीय आयुक्त डॉ. संजीवकुमार यांनी केले.

# थोडक्यात...

## साडेसहा हजारांवर झाडांचे बुंधे केले मोकळे

नागपूर : सिमेंट रस्त्यांच्या कामामुळे अस्तित्व धोक्यात आलेल्या साडेसहा हजारांवर झाडांचे बुंधे मोकळे करण्यात मनपा प्रशासनाला यश आले आहे. सिमेंट मार्गाच्या बांधकामामुळे शहरातील १०४७२ झाडे सिमेंटच्या विळख्यात आली होती. यापैकी ६७५४ झाडांचे बुंधे मोकळे करण्यात आले असून उर्वरित ३७१८ झाडांचे बुंधे येत्या दोन आठवड्यात मोकळे करण्याचे निर्देश मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. सिमेंट रस्त्यांच्या विळख्यातील झाडांसंदर्भात आयुक्त अभिजीत बांगर यांनी नुकतीच आढावा बैठक घेतली. बैठकीत अधीक्षक अभियंता मनोज तालेवार यांच्यास सर्व झोनचे कार्यकारी अभियंता प्रामुख्याने उपस्थित होते. सिमेंट रस्त्याच्या बांधकामादरम्यान रस्त्यालगत असलेल्या बहुतांशी झाडांना सिमेंटचे आवरण करण्यात आले होते. कंत्राटदाराच्या चुकीमुळे हजारो झाडांचे अस्तित्वच धोक्यात आले होते. संपूर्ण देशात 'ग्रीन सिटी' म्हणून नागपूर शहराची ओळख आहे. मात्र या शहराच्या सौंदर्यात भर घालणा–या 'ग्रीनरी'वरच आघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत शहरात पर्यावरण क्षेत्रात कार्य करणारी संस्था ग्रीन व्हिजील फाऊंडेशनने संस्थेचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी यांच्या नेतृत्वात मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्या लक्षात ही बाब आणून देण्यात आली. यासंदर्भात आयुक्तांनी गांभीर्याने दखल घेत शहरातील सिमेंट रस्त्यामुळे अस्तित्व धोक्यात आलेल्या झाडांच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले. सर्वेक्षणाअंती शहरातील २५२३७ झाडांपैकी १४७६५ झाडे सुरक्षित आढळली. मात्र १०४७२ झाडांच्या अस्तित्वाला धोका असल्याचे दिसून आले. यावर तातडीने कार्यवाही करीत आयुक्त अभिजीत बांगर यांनी झाडांची बुंधे लवकरात लवकर मोकळे करण्याचे आदेश दिले. मागील महिनाभरापासून सुरू असलेल्या या मोहिमेने गती पकडली असून आतापर्यंत ६७५४ झाडांची बुंधे मोकळा श्वास घेउ लागली आहेत तर अद्यापही ३७१८ झाडांची बुंधे मोकळी होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. सिमेंट रोडमुळे धोक्यात आलेल्या सर्व झाडांचे अस्तित्व अबाधित राहावे, यासाठी दोन आठवड्यात उर्वरित सर्व झाडांचे बुंधे मोकळे करण्याचे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले.

## स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती निमित्त मनपातर्फे अभिवादन

नागपूर : नागपूर महानगरपालिकेव्दारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १३६ व्या जयंती निमित्त महापौर नंदा जिचकार व उपमहापौर श्री.दिपराज पार्डीकर यांनी शंकरनगर स्थित सावरकरांच्या पुतळयाला माल्यार्पण करुन अभिवादन केले.या प्रसंगी नगरसेवक सुनील हिरणवार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे डॉ.राजाभाऊ शिलेदार, डॉ. कूमार शास्त्री, सावरकर समितीचे अध्यक्ष चंद्रकांत लाखे, डॉ. अजय कुळकर्णी, प्रा.प्रमोद सोवनी, शिरीष दामले, मुकुंद पाचखेडे, महादेव बाजीराव, अथर्व जलतारे, संजय व उदय कठाळे, रवींद्र कासखेडीकर, सावरकरांचे वेषभूषेत सर्जेराव गलपट, सहाय्यक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस, राजेश वासनिक तसेच परशुराम ब्राम्हण संघ व हिंदू महासभेचे पदाधिकारी कार्यकर्ता व परिसरातील बहुसंख्य नागरीक प्रामुख्याने उपस्थित होते.

## मनपातर्फे मधुमेह व्यवस्थापन विषयावर कार्यशाळा



नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने निरंतर वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमांतर्गत बुधवारी (ता.२२) मनपाच्या इंदिरा गांधी रूग्णालयामध्ये मधुमेह व्यवस्थापन विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेमध्ये गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. राजश्री खोत यांनी मार्गदर्शन करून उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले.याप्रसंगी मनपाच्या आरोग्य अधिकारी डॉ. सरीता कामदार, डॉ. विजय जोशी, लसीकरण अधिकारी डॉ. नवखरे, टाटा ट्रस्टचे डॉ. अमर नवकर, डॉ. टिकेश बिसेन, राष्ट्रीय शहरी आरोग्य मिशनच्या समन्वयक दिपाली नागरे यांच्यासह दहाही झोनचे झोनल वैद्यकीय अधिकारी, मनपा रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व राष्ट्रीय शहरी आरोग्य मिशनचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ. राजश्री खोत यांनी मधुमेहाची लक्षणे, त्याबद्दल घ्यावयाची काळजी आणि डॉक्टर म्हणून आपली भूमिका, बदलत्या काळानुसार बदलत गेलेल्या मधुमेहाच्या उपचार पद्धती आदी बाबींवर विस्तृत मार्गदर्शन केले. ऐन तारुण्यातील, प्रसुती काळातील मधुमेहाचे स्वरूप व त्याचे व्यवस्थापन याबद्दल मार्गदर्शन करून डॉ. राजश्री खोत यांनी उपस्थित डॉक्टरांच्या शंकांचे समाधान केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार मनपाच्या आरोग्य अधिकारी डॉ. सरीता कामदार यांनी मानले.

## वडाच्या झाडाला वाचविण्यासाठी मनपा आयुक्तांची अशीही धडपड

नागपूर : शहरातील झाडांनी मोकळा श्वास घ्यावा यासाठी नागपूर महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेतलेल्या पुढाकाराचे पर्यावरणप्रेमींनी स्वागत केले. दरम्यान, रस्ता रुंदीकरणामुळे अस्तित्व धोक्यात आलेल्या एका वडाच्या झाडाला वाचविण्यासाठी आयुक्तांची सुरू असलेली धडपड लक्षात घेता पर्यावरणप्रेमींनीही ते झाड वाचविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. अंबाझरी बगिच्याच्या समोरील भागात सुमारे १५० वर्षे जुने वडाचे झाड आहे. चार वर्षांपूर्वी बगिच्यासमोरील रस्त्याचे रुंदीकरण झाले. रस्ता रुंदीकरणात झाडाखालील माती निघाली आणि झाडाची मुळं बाहेर निघू लागली. दरवर्षी पावसाळ्यात झाडाच्या बुंध्याभोवतालची माती वाहून जाऊ लागली आणि या झाडाचे अस्तित्वच धोक्यात आले. मुळं बाहेर आल्यामुळे झाड जगण्याची शक्यता मावळू लागली. शिवाय झाड कोसळण्याचा धोकाही निर्माण झाला. ग्रीन व्हिजील फाऊंडेशनने ही बाब आयुक्त अभिजीत बांगर यांच्या लक्षात आणून दिली. आयुक्तांनी स्वत: ह्या झाडाची पाहणी केली. वडाचे 'ते' झाड वाचविण्यासाठी काय करता येईल, यासंदर्भात त्यांनी ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी यांच्याशी चर्चा केली. झाडाच्या भोवताल लहान भिंत बनवून त्यामध्ये माती आणि खत टाकले तर झाड जगू शकेल, असा उपाय श्री. चॅटर्जी यांनी सुचविला. आयुक्त अभिजीत बांगर यांनी या सूचनेवर लगेच अंमल करीत उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यानुसार निर्देश दिले. या निर्देशानुसार मनपाच्या उद्यान विभागाने झाडाला वाचविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. आयुक्त अभिजीत बांगर यांचे वृक्षप्रेम यानिमित्ताने पुन्हा एकदा समोर आले असून त्यांच्या पर्यावरणवादी दृष्टिकोनामुळे दीडशे वर्षे जुन्या वडाच्या झाडाला जीवदान मिळणार आहे.



## नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवा : राम जोशी

नागपूर : नैसर्गिक आपत्ती अचानकपणे आली तर त्याला सामोरे जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी. होणाऱ्या नुकसानीची व्याप्ती कमी व्हावी यासाठी सुरू असलेली कामे तातडीने आटोपती घ्यावी. जीवितहानी होणार नाही आणि नागरिकांना आवश्यक ती मदत तातडीने पोहचविता येईल, यादृष्टीने तत्पर राहावे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी केले.नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील आयुक्त कार्यालय सभागृहात शुक्रवारी (ता. ३१) नैसर्गिक आपत्ती पूर्व तयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, आरोग्य अधिकारी डॉ. सुनील कांबळे, सहायक आयुक्त महेश मोरोणे, प्रकाश वराडे, राजू भिवगडे, गणेश राठोड, हरिश राऊत, स्मिता काळे, कार्यकारी अभियंता अनिरुद्ध चौगंजकर, अमीन अख्तर, मोती कुकरेजा, राजेश राहाटे, गिरीश वासनिक, अविनाश बाराहाते, अतिरिक्त सहायक आरोग्य अधिकारी डॉ. विजय जोशी, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार उपस्थित होते. सदर बैठकीत पावसाळापूर्व नियोजनाअंतर्गत केलेल्या कार्यवाहीचा झोननिहाय आढावा घेण्यात आला. सर्व झोन कार्यालयात १ जूनपासून आपातकालीन नियंत्रण कक्ष सुरू करण्यात येणार असल्याची माहिती झोन सहायक आयुक्तांनी दिली. मनपा मुख्यालयातही नियंत्रण कक्ष राहणार असून आपातकालीन परिस्थितीत नागरिक या कक्षाशी संपर्क साधू शकतील, अशी माहिती यावेळी अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त राम जोशी आणि अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख यांनी नदी स्वच्छता अभियान, नाले सफाईचा आढावा घेतला. झाडांसंदर्भात विद्युत विभागाशी समन्वय ठेवण्यात यावा. नदी काठावरील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात यावे, धोकादायक इमारती पाडण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्यात यावी, असे निर्देश यावेळी अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## नदी स्वच्छतेच्या कामाची गती वाढवून नियमित सफाई करा : महापौर नंदा जिचकार



नागपूर : शहरात सर्वत्र नदी स्वच्छता अभियान सुरू आहे. मात्र वस्त्यांमधून वाहणा–या नद्यांमध्ये कचरा टाकण्यात येत असल्याने तो कचरा पूलाखाली अडकतो त्यामुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होतो व परिसरात दुर्गंधी पसरते. शहरात अनेक ठिकाणी अशीच स्थिती आहे. याकडे गांभीर्याने लक्ष देत पावसाळ्यामध्ये नागरिकांना कोणतिही अडचण निर्माण होउ नये यासाठी नदी स्वच्छतेच्या कामाची गती वाढवा व नियमित सफाई करा, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले. शहरात सुरू असलेल्या नदी स्वच्छता अभियानांतर्गत महापौर नंदा जिचकार यांनी शुक्रवारी (ता.३१) नाग नदीच्या स्वच्छतेचे निरीक्षण केले. यावेळी स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, धंतोली झोन सभापती विशाखा बांते, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेविका कांता रारोकर, मनिषा अतकरे, नगरसेवक राजकुमार साहु, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, नदी स्वच्छता अभियानाचे नोडल अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. सुनील कांबळे, कार्यकारी अभियंता अनिरुद्ध चौगंजकर, कार्यकारी अभियंता (स्लम) राजेंद्र रहाटे, कार्यकारी अभियंता अनिल कडू, धंतोली झोनच्या सहायक आयुक्त स्मिता काळे, उपअभियंता सी.आर. गभणे, उपअभियंता अजय डहाके आदी उपस्थित होते. नदी स्वच्छता अभियान निरीक्षण दौऱ्यामध्ये महापौर नंदा जिचकार, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे यांच्यासह इतर पदाधिका–यांनी शहरातून वाहणा–या नाग नदीच्या विविध स्थळाची पाहणी केली. त्यामुळे येथे कचरापण अडकला जातो. अशा ठिकाणी लवकरात लवकर मजुरांकडून स्वच्छता करणे, तसेच पुलाच्या जवळ ३० मीटर पर्यंतच्या भागात दर तीन दिवसांनी नियमीत सफाई करण्याचे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

## कर्तव्यदक्ष चालक आणि वाहकाचा मनपातर्फे सन्मान



नागपूर : हिंगणा मार्गावरील बालाजीनगर येथे मंगळवारी (ता.२८) आपली बसला लागलेल्या आगीमध्ये प्रसंगावधान दाखवून सुमारे १५ प्रवाशांचा जीव वाचविणा–या कर्तव्यदक्ष चालक आणि वाहकाचा बुधवारी (ता.२९) नागपूर महानगरपालिकेतर्फे सत्कार करण्यात आला. मनपाचे परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांच्या हस्ते आपली बसचे चालक मनिष करांगळे व वाहक अमित किटुकले यांना शाल, पुष्पगुच्छ, श्रीफळ व रोख पुरस्कार देउन सन्मानित करण्यात आले. यावेळी परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, प्रशासकीय अधिकारी रवींद्र पागे, श्रम अधिकारी अरुण पिपरूडे, यांत्रिकी अभियंता योगेश लुंगे, सहायक प्रभव बोकारे, बस ऑपरेटरचे प्रतिनिधी निलमणी गुप्ता, आर.के.साटी, स्मार्ट सिटी बस ऑपरेटर श्री. पारेख, डिम्स कंपनीचे सतीश सदावर्ते उपस्थित होते. मंगळवारी (ता.२८) ऑरेंटस्ट्रिट डेपोमधील मे. हंसासिटी बस सर्व्हीसेस प्रा.लि. नागपूरतर्फे संचालन करण्यात येत असलेली बस क्रमांक एम.एच.३१ सी.ए.६२४५ ही बस ड्युटी क्रमांक १३५/ए वर हिंगणा ग्रामिण दवाखाना ते बर्डी मार्गावर सेवा देत होती. हिंगणा मार्गावरील बालाजीनगर महिंद्रा कंपनीजवळ सकाळी ६.२० वाजता दरम्यान शार्ट सर्कीटमुळे अचानक बसने पेट घेतला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता प्रसंगावधान दाखवून चालक मनिष करांगळे (आयडी क्र. ३०४६९) यांनी लगेच बस रस्त्याच्या बाजुला उभी केली व वाहक अमित किटुकले (आयडी क्र. ९०१५८) यांच्या मदतीने बसमधील अंदाजे १५ प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. यानंतर लगेच त्यांनी एमआयडीसी नागपूर शहर पोलिस स्टेशन व अग्निशमन विभागाला तात्काळ माहिती दिली. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांनी शहर बस वाहतूक करणारे सर्व ऑपरेटर व डेपो यांनी सर्व गाड्यांची तात्काळ तपासणी करून वायरींग सिस्टीम दुरूस्त करून घेणे व दुरूस्त

## उद्धारली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे

**महागायक अभिजीत कोसंबीने रसिकमन जिंकले; छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती समारोह**




नागपूर : 'उद्धारली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे' या आणि अशा अनेक चेतविणाऱ्या, महापुरुषांच्या कर्तृत्वाची आणि विचारांची महती सांगणारी एकाहून एक अशी सरस गीते गाऊन महाराष्ट्राचे महागायक अभिजीत कोसंबी यांनी रसिकांना जिंकले.निमित्त होते छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या संयुक्त जयंती समारोहाचे. नागपूर महानगरपालिका आणि अधिकारी, कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (ता. २८ मे) सायंकाळी नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हील लाईन्स मुख्यालयातील हिरवळीवर आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त सेव्ह द चिल्ड्रन, इंडियाचे विभागीय समन्वयक अनिरुद्ध पाटील यांचे प्रबोधन आणि महागायक अभिजीत कोसंबी यांच्या गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, शिवसेनेचे गटनेते किशोर कुमेरिया, कर आकारणी समितीचे सभापती संदीप जाधव, क्रीडा समितीचे सभापती नागेश सहारे, विधी समितीचे सभापती धर्मपाल मेश्राम, नेहरूनगर झोन सभापती रिता मुळे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, नगरसेवक भगवान मेंढे, राजेंद्र सोनकुसळे, नगरसेविका उज्वला बनकर, वंदना भगत, भंते नागाप्रकाश, सर्वश्री सेवानिवृत्त विभागीय परिवहन अधिकारी शरद जिचकार, मंत्रालयातील महसूल विभागाचे कक्ष अधिकारी शरद ढोके, सहायक आयुक्त महेश मोरोणे, राजू भिवगडे, अशोक पाटील, विजय हुमणे, कार्यकारी अभियंता राजेंद्र राहाटे, अभियंता कल्पना मेश्राम, कर्मचारी नेते राजेश हाथीबेड, विनोद धनविजय, अशोक पानतावणे, अनिरुद्ध पाटील उपस्थित होते. मान्यवरांनी चारही महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. यानंतर महागायक अभिजीत कोसंबी, प्रबोधनकार अनिरुद्ध पाटील, संगीतकार भूपेश सवाई, पल्लवी मडके–नीतनवरे यांचा महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या स्वागतानंतर महागायक अभिजीत कोसंबी यांनी महापुरुषांच्या गौरवार्थ गीतांजली अर्पण केली. महापुरुषांचे कर्तृत्व सांगणारे एका पेक्षा एक सरस गीते गाऊन रसिक मनाला चेतविले. यश अशोक कोल्हटकर यांनी 'छातीठोक सांगू या जगाला, असा विद्वान होणार नाही' ह्या आणि अन्य गीतांतून रसिकांची वाहवा मिळविली. गायक मोहनकुमार भोयर, गौरव बन्सोड यांनीही भीमगीते गाऊन स्फुरण चढविले. 'ए मानव तू मुख से बोल, बुद्धं सरणं गच्छामि...' या गीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. संपूर्ण कार्यक्रमाला प्रसिद्ध संगीतकार भूपेश सवाई यांनी स्वरसाज चढविला. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले. तर आभार कर्मचारी नेते राजेश हाथीबेड यांनी मानले.

### अनिरुद्ध पाटील यांचे प्रबोधन

संगीत रजनीच्या अगोदर सेव्ह द चिल्ड्रन इंडियाचे विभागीय समन्वयक अनिरुद्ध पाटील यांनी प्रबोधनपर मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रम, त्यांचे नियोजन आणि दूरदृष्टी, महात्मा जोतिबा फुले यांनी सामाजिक क्रांतीतून दिलेली दिशा, छत्रपती शाहू महाराजांचा विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीव्यवस्था झुगारून मांडलेला विचार आणि त्या विचारांच्या साक्षीनेच देशाला दिलेले संविधान आदींची सांगड घालत त्यांच्या पुरोगामी विचारधारेचा उहापोह केला. निसर्ग आपल्याला भरभरून देतो. जास्त मिळाले तरी तक्रार करतो आणि कमी मिळाले तरी तक्रार करतो. त्यामुळे तक्रार करण्यापेक्षा जे मिळते त्याचे संवर्धन करा, हा डॉ. बाबासाहेबांचा विचार मांडत दुष्काळी परिस्थिती ओळखणाऱ्या बाबासाहेबांच्या विचारांवर तेव्हाच अंमल केला असता तर आज दुष्काळी परिस्थिती या देशावर ओढावली नसती, असे सांगितले. या महापुरुषांच्या विचारांवर चला, देश प्रगतीकडे जाईल, असा संदेश त्यांनी आपल्या प्रबोधनातून दिला.